# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः16.04.2025** **वारःबुधवार**

---

**ठळक बातम्या**

- नगर परिषदा, नगरपंचायती, औद्योगिक नगरींच्या नगराध्यक्षांना बहुमताने हटवण्याच्या तरतुदींना राज्य मंत्रिमंडळाची मान्यता; कोठडीत कैद्याचा मृत्यू झाल्यास भरपाई देण्याच्या धोरणालाही मंजुरी
- मुंबई, पुणे आणि नागपूरमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता केंद्र उभारण्यासंदर्भात राज्य सरकारचा सामंजस्य करार
- राज्यातील 20 औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारणार
- शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार जाहीर, माजी कबड्डीपटू शंकुतला खटावकर यांना जीवनगौरव पुरस्कार

आणि

- यंदाच्या पावसाळ्यात सरासरीपेक्षा 5 टक्के जास्त पाऊस पडण्याचा हवामान विभागाचा अंदाज

**मंत्रि मंडळ निर्णय**

राज्यातल्या नगर परिषदा, नगरपंचायती, औद्योगिक नगरींच्या अध्यक्षांना पदावरून दूर करण्याच्या अधिनियमात सुधारणा करायला आणि अध्यादेश काढण्याला काल मंत्रिमंडळाने मान्यता दिली. यापूर्वी नगराध्यक्षांना पदावरुन दूर करण्याच्या प्रक्रियेत; निवडून आलेल्या सदस्यापैकी पन्नास टक्के सदस्यांच्या सह्यांचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवला जात असे. त्यानंतर शासनस्तरावर अध्यक्षांना पदावरून दूर करण्याची कार्यवाही केली जात असे.

राज्यातल्या नगरपरिषदा, नगरपंचायती, औद्योगिक नगरीतील स्थावर मालमत्तांच्या भाडेपट्ट्यांच्या नियमांत बदल करण्यात आले असून नवीन दराबाबत अधिसूचना काढण्यालाही या बैठकीत मंजूरी देण्यात आली. या स्थानिक संस्थांच्या थकीत मालमत्ता कर वसूलीसाठी दंड माफ करून, वसूली वाढविण्यासाठी अभय योजना लागू करण्याला यावेळी मान्यता देण्यात आली.

राज्यातल्या कारागृहांमध्ये कोठडीत असलेल्या कैद्यांचा मृत्यू अनैसर्गिक कारणांमुळे झाल्यास, त्याच्या वारसांना राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाच्या सूचनेनुसार भरपाई देण्याच्या धोरणाला या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

**करार**

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून प्रशासनात आमूलाग्र सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीनं राज्य शासन आणि आयबीएम टेक्नॉलॉजी यांच्यात काल मुंबईत महत्त्वपूर्ण सामंजस्य करार झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. या कराराअंतर्गत मुंबई, पुणे आणि नागपूर या तीन ठिकाणी एआय कौशल्य आणि उत्कृष्टता केंद्र उभारली जाणार आहेत. मुंबईत भौगोलिक विश्लेषणासाठी, पुण्यात न्यायवैद्यकीय विज्ञानाच्या पायाभूत सुविधांसाठी तर नागपूरमध्ये प्रगत AI संशोधना संदर्भातील केंद्र स्थापन केलं जाणार आहे.

**मुख्यमंत्री आयआयटी**

राज्यातील 20 औद्योगीक प्रशिक्षण संस्थांमध्ये अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारण्यात येणार आहे. मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत काल कौशल्य रोजगार उद्योजकता आणि नावीन्यता विभागाचे तीन सामंजस्य करार करण्यात आले. या अंतर्गत सूक्ष्म आणि लघु उद्योजकांच्या प्रशिक्षणासाठी मेळावे, तसंच आयटीआयमध्ये शिकणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षण देऊन रोजगाराच्या संधी वाढवण्यात येणार आहेत. यासाठी 2025-26 पासून पुढील चार वर्षांत प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रत्येक वर्षी केंद्रांची संख्या आणि प्रशिक्षणार्थ्यांची संख्या वाढवण्यात येणार आहे.

**भेट**

राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी काल नवी दिल्ली इथं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. यावेळी राज्यपालांनी पंतप्रधानांशी महाराष्ट्राच्या विकासासह विविध विषयांवर चर्चा केली.

**पोषण पंधरवडा**

केंद्र सरकारच्या महिला बालविकास मंत्रालयाच्या वतीनं देशात ७वा पोषण पंधरवडा राबवण्यात येत आहे. या मोहिमेसंदर्भात चंद्रपूरच्या ग्रामीण आरोग्य अधिकारी ज्योती डांगे यांनी अधिक माहिती दिली ...

**केंद्र सरकार आणि बाल विकास मंत्रालयाच्या माध्यमातून दरवर्षी पोषण पंधरवडा साजरा केला जातो. 2025 मध्ये 7 वा पोषण पंधरवडा 8 ते 22 एप्रिल दरम्यान सुरु आहे, यावर्षीच्या पोषण पंधरवड्यात माता आणि अर्भकांचे पोषण लाभार्त्यांसाठी डीजीटल सुविधा आणि लट्ठपणा शी लढत या वर लक्ष देत आहोत या पंधरवड्यात महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करून मार्गदर्शन केले जात आहे. कुपोषणाला 100 टक्के मात देऊन त्याला हद्द पार करण्यासाठी सरकारच्या वचन बद्धतेला अनुसरून हा पंधरवडा आपण साजरा करत आहोत.**

**जल व्यवस्थापन पंधरवडा**

राज्याच्या जलसंपदा विभागाच्या वतीने जल व्यवस्थापन कृती पंधरवड्याचं आयोजन करण्यात आलं असून याचा प्रारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काल मुंबईत झाला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यावेळी उपस्थित होते. जलसाक्षरता वाढवणं, पाण्याच्या बचतीचं महत्त्व पटवून देणं आणि जल व्यवस्थापनाच्या शाश्वत उपाययोजना राबविण्याच्या उद्देशानं या उपक्रमाचं आयोजन केलं आहे. राज्यात सर्वत्र या उपक्रमाचा प्रारंभ काल झाला. धुळे जिल्ह्यातील तापी, बुराई, अनेर, पांझरा, कान या पाच नद्यांचं जलपूजन करून, जलगीत सादर

करण्यात आलं तसंच उपस्थितांना जल बचतीची प्रतिज्ञा देण्यात आली. लातूरमध्ये गावोगावी चित्ररथाद्वारे जनजागृती केली जाणार आहे. या चित्ररथाला जिल्हाधिकाऱ्यांनी हिरवा झेंडा दाखवला. अहिल्यानगरमध्ये सर्व विभागांनी केवळ 15 दिवस उपक्रम न राबविता वर्षभर निश्चित उद्दिष्ट समोर ठेऊन नियोजनावर भर द्यावा असं आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केलं. सांगलीमध्ये शेतकरी संवाद, चर्चासत्र आदी उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

**क्रीडा पुरस्कार**

2023-24 या वर्षासाठीच्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांची घोषणा क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांनी काल केली. माजी राष्ट्रीय कबड्डीपटू, संघटक शंकुतला खटावकर यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. तर पॅरा-ऑलिम्पिक पदक विजेता सचिन खिलारी, जागितिक पदक विजेते क्रीडापटू आदिती स्वामी, ओजस देवतळे, क्रिकेटपटू शिवम दुबे, ऋतुराज गायकवाड, यशस्वी जैस्वाल यांना शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारानं गौरवलं जाणार आहे. येत्या शुक्रवारी पुण्यात म्हाळुंगे बालेवाडी इथल्या शिवछत्रपती क्रीडा संकुलात राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात येतील.

राज्य शासनातर्फे जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाल्यानंतर माजी कबड्डीपटू शंकुतला खटावकर यांनी आकाशवाणीकडे आपल्या भावना व्यक्त केल्या........

**मला महाराष्ट्र शासनाचा जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाला अर्थात त्या बद्दल नक्कीच आनंद झाला तुम्ही म्हणालात की जीवन गौरव पुरस्कार आता पुढे काय जीवन गौरव पुरस्कार पुरस्कार मिळाला म्हणजे मी थांबणार नाहीये, मला थांबण्यासाठी हे दिलेले नाहीये तर हे आव्हान म्हणून मी स्वीकारत आहे की आत्तापर्यंत जे काय गोष्टी माझ्याकडून करायच्या राहिल्यात ते माझ्या कब्बडी खेळासाठी किंव्हा अन्य खेळासाठी त्या गोष्टी कि जसे आपले कोचेस आहेत पंच आहेत आमचे शिक्षक आहेत या सर्वांसाठी आपल्याला काही करायचं जेणेकरून ते सक्षम होतील आणि महाराष्ट्रामध्ये आमचं , कबड्डीच नाव लौकिक होईल .**

**विभागीय नाट्य संमेलन**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचं 100 वं विभागीय नाट्य संमेलन येत्या 24 एप्रिलपासून नागपुरमध्ये होणार आहे. परिषदेचे अध्यक्ष आणि अभिनेता प्रशांत दामले यांनी काल नागपूरमध्ये पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. या संमेलनात व्यावसायिक नाटक, लोककलेवरील कार्यक्रम, स्थानिक शाखेचे आणि  कलावंतांचं सादरीकरण तसंच बालकलावंतांची विशेष प्रस्तुती असणार आहे.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल चंदिगडमध्ये झालेल्या सामन्यात पंजाब किंग्ज संघानं कोलकाता नाईट रायडर्सवर 16 धावांनी विजय मिळवला. दिल्ली कॅपिटल्सचा सामना आज राजस्थान रॉयल्स बरोबर दिल्लीच्या अरुण जेटली मैदानावर खेळला जाईल.

**अपघात**

बुलडाणा जिल्ह्यात काल बस आणि ट्रक यांचा अपघात होऊन 4 जणांचा मृत्यू झाला तर  10 जण गंभीर जखमी झाले. मध्यप्रदेश परिवहन निगमची बसची समोरुन येणाऱ्या ट्रकशी धडक झाल्यानं हा अपघात झाला.

**कुलथे निधन**

महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे संस्थापक ग.दि.कुलथे यांच्या पार्थिवावर काल नवी मुंबईतल्या स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. कुलथे यांचं सोमवारी रात्री नवी मुंबईतल्या राहत्या घरी हृदयविकारानं निधन झालं. ते 87 वर्षांचे होते. राज्य शासकीय राजपत्रित अधिकारी संघाचं त्यांनी प्रदीर्घकाळ नेतृत्व केलं. सेवानिवृत्तीनंतरही ते संघटनेचे सल्लागार म्हणून कार्यरत होते.

**हवामान अंदाज**

यंदा जून ते सप्टेंबर या कालावधीत सरासरीच्या 5 टक्के जास्त पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. भारतीय हवामान विभागाचे महासंचालक डॉक्टर मृत्यूंजय मोहपात्रा यांनी काल नवी दिल्ली इथं पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. देशातल्या अनेक भागात सरासरीइतका किंवा त्यापेक्षा अधिक पाऊस पडेल, तसंच ईशान्य आणि वायव्य भारतात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**हवामान**

दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. विदर्भात जोराचे वारे आणि वीजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार**